**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०५ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. मराठीच्या मुद्द्यावर एकजूट कायम राखण्याचं राज आणि उद्धव ठाकरे यांचं आवाहन.
2. पुढील चार महिन्यात भंडारा ते नागपूर रस्त्याचे सहा पदरी करणाच काम चालू होणार- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा.
3. आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या विविध भागांतून निघालेल्या संतांच्या पालख्या पंढरपुरात दाखल, प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त.
4. सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशनं पटकावलं विजेतपद.

-------------------------------------------

**राज ठाकरे-उद्धव ठाकरे**

मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करुन एकत्र यावं असं आवाहन राज आणि उद्धव ठाकरे यांनी आज केलं. मुंबईत वरळीत झालेल्या विजयी मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरे यांच्या भाषणानं या मेळाव्याला सुरुवात झाली. ते म्हणाले

*(होल्ड बाईट - राज ठाकरे बाइट -१६ सेकंद )*

*मी असं म्हटलं होतं की, कोणत्याही वादापेक्षा आणि कुठल्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. आज जवळपास 20 वर्षानंतर मी आणि उद्धव आम्ही एका व्यासपीठावरती आज येतो आहोत . जे माननीय बाळासाहेबांना जमलं नाही. जे अनेकांना जमलं नाही. आम्हाला दोघांना एकत्र आणायचं, ते देवेंद्र फडणवीसांना जमलं*

या लोकांनी भाषेपासून सुरू केलं असून, नंतर आपल्याला जातीपातींमध्ये विभागण्या चा डाव असल्याचा दावा, राज ठाकरे यांनी केला. इंग्रजी माध्यमातून मुलांनी शिक्षण घेत असल्याच्या मुद्द्याच्या, त्यांनी समाचार घेतला.बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे इंग्रजी माध्यमातून शिकले होते मात्र त्यांच्या मराठीच्या प्रेमावर कुणालाही शंका घ्यायला जागा नव्हती. याकडे त्यांनी लक्ष वेधलं. त्यामुळं भाषेचा अभिमान बाळगण्यासाठी कुठल्या भाषेत शिक्षण घेतलं हे महत्त्वाचं नाही असं ते म्हणाले.त्याच वेळी भाषेच्या मुद्द्यावरुन उगाच मारहाण न करण्याचा सल्ला त्यांनी कार्यकर्त्यांना

दिला. भाषणाच्या शेवटी त्यांनी मराठी, मराठी भाषा, मराठी माणूस या मुद्द्यावर तडजोड होणार नाही हे स्पष्ट केलं.त्यानंतर भाषणाला आलेल्या उद्धव ठाकरे यांनी भाषणापेक्षा एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे असं म्हणून सुरुवात केली.

*(होल्ड बाईट - उद्धव ठाकरे १० सेकंद )*

*पण एक गोष्ट नक्की कि, आमच्या दोघांमध्ये जो काही अंतर पाठ होता तो आण्याजीं पंतांनी दूर केला. आता अक्षता टाकण्याची काही तुमच्याकडे अपेक्षा नाही आहे. एकत्र आलो आहे एकत्र राहण्यासाठी.*

राजकारण्यांनी आतापर्यंत मराठी माणसांना वापरलं आणि फेकून दिलं. संकटात मराठी माणूसं एकत्र येतो आणि संकट गेल्यावर एकमेकांशी भांडतो, यापुढे अशा डावांना बळी पडू नका, सर्व पक्षातल्या मराठी माणसांनी एकत्र यावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं.आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही मात्र सक्तीच्या विरोधात आहेत.त्यामुळं कोणावर दादागिरी करणार नाही पण दादागिरी केली तर ती सहन करणार नाही, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मराठीची सक्ती केली. मराठी भाषा भवनाचं भूमीपूजन केलं या गोष्टी पुढे खोळंबल्या असा दावा त्यांनी केला.

---------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

मराठी भाषेच्या नावाखाली उद्धव ठाकरे यांनी आपली सत्ता गेल्याचं शोकगीत गायल्याची टीका राज्याचे महसूल मंत्री, चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री असताना, पहिली पासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही असंही ते यावेळी म्हणाले.मराठी भाषेचं प्रेम धोरणात दिसलं पाहिजे असं म्हणताना ठाकरे यांची ही भूमिका, महापालिका निवडणुकां साठीची असल्याची टीकाही बावनकुळे यांनी समाज माध्यमावर केली.

---------------------------------------------

सत्कार

महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीश पदी नियुक्ती झाल्याबद्दल, त्यांचा महाराष्ट्र विधान मंडळातर्फे सत्कार करण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा आठ जुलै रोजी दुपारी दोन वाजता, मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई इथं आयोजित करण्यात आला असल्याची घोषणा आज विधान परिषद सभागृहात, सभापती प्रा.राम शिंदे यांनी तर विधान सभेत, अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर यांनी केली.

---------------------------------------------

नितीन गडकरी

भंडारा ते नागपूर या रस्त्याच्या सहापदरीकरणाच काम पुढील चार महिन्यात सुरू होईल अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज भंडारा येथे केली .राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या द्वारे राष्ट्रीय महामार्ग 53 वरील भंडारा बायपास तसेच मौदा वाय जंक्शन येथील सहा पदरी उड्डाणपुलाचे लोकार्पण तसेच भंडारा जिल्ह्यातील वेगवेगळ्या मार्गांचे डांबरीकरण तसेच मजबूतीकरणाच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम आज भंडारा येथील महश्री विद्यामंदिर मैदान अशोकनगर येथे त्यांच्या हस्ते पार पडला त्यावेळी ते बोलत होते . सदर बायपास मुले वाहतूक समस्या सुटण्यासोबत अपघातांचे प्रमाण कमी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला -

*(होल्ड बाईट नितीन गडकरी -२२ सेकंद )*

*आणि आज जवळपास 735 कोटी रुपयांचा अतिशय आधुनिक असा नवीन बायपास आज भंडाराला मिळाला याबद्दल भंडाराच्या जनतेचा मी मनापासून अभिनंदन करते त्याचबरोबर मौदा आणि भंडारा या दोन्ही ठिकाणी अनेक अ‍ॅक्सिडेंट 25-30 लोकांचा मृत्यू या ठिकाणी हा बायपास नसताना या रस्त्यावर अ‍ॅक्सिडेंटमुळे झाला त्यामुळे आता अ‍ॅक्सिडेंट होणार नाही ही देखील आपल्या सगळ्यांसाठी आनंदाची आणि समाधानाची गोष्ट आहे.*

राष्ट्रीय महामार्ग-53 वरील 14.8 किमी लांब भंडारा बायपास भंडारा शहरातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी अत्यंत आवश्यक होता.नागपूर-रायपूर-कोलकाता मार्गावरील जड वाहने यापुर्वी भंडारा शहरातील दुपदरी मार्गावर जात होते.ज्यामुळे अधिक विलंब व अधिक इंधन खर्च होऊन अपघातांचा धोका निर्माण होत होता. भंडारा बायपासमुळे वाहतुक सुलभता होईल, असं नितीन गडकरी यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी भंडारा-गोंदिया गोंदियाचे खासदार डॉ.प्रशांत पडोळे प्रामुख्याने उपस्थित होते.आज मानेगाव येथील व्हेहीकुलर ओवरपास व ब्लॅक स्पॉट सुधारणा लांबी 1.9 कि.मी बपेरा ते तुमसर राज्य मार्ग लांबी 18 कि.मी आणि खापा ते भंडारा राज्य मार्गाचे डांबरीकरण आणि मजबुतीकरण लांबी 28 कि.मी या तीन कामाचे डिजीटल भुमीपुजन संपन्न झाले.तसंच भंडारा बायपास आणि मौदा वाय जंक्शन, सहालेन उडडाणपुल या दोन विकास कामांचे डिजीटल लोकार्पण गडकरी यांच्या हस्ते झाले. सकाळी वैनगंगा नदीवर जलपुजन आणि भंडारा बायपासची पाहणी केल्यानंतर, महर्षी विदयामंदीर येथील कार्यक्रमास ते उपस्थित होते.

---

लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जून महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया कालपासून सुरू करण्यात आली आहे. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी समाज माध्यमावरील आपल्या संदेशाद्वारे ही माहिती दिली.योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार कार्डाशी सलग्न बँक खात्यात उद्यापासून हा सन्मान निधी जमा होणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

------------------------------------------

आषाढी एकादशी

आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या विविध भागांतून निघालेल्या संतांच्या पालख्या आता पंढरपुरात दाखल होत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी वाखरी इथं मुक्कामी असून संत तुकाराम महाराज, सोपान काका महाराज, संत मुक्ताई, संत गजानन महाराज यांच्या पालख्या पंढरपूर जवळ पोहोचल्या आहेत. यंदाच्या आषाढी वारीसाठी पंढरपुरात वीस लाख भाविक येतील असा प्रशासनाचा अंदाज आहे.एकादशीपूर्वीच पंढरपुरात दहा लाख भाविक दाखल झाले आहेत. पंढरपुरात नगर प्रदक्षिणा मार्ग, नामदेव पायरी, विठ्ठल मंदिर परिसर गर्दीनं फुलून गेला आहे. तर मंदिरामध्ये फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. पंढरपूर शहरात पालिकेनं स्वच्छतेच्या दृष्टीनं तब्बल साडेसोळाशे कर्मचारी नियुक्त केले आहेत. याठिकाणी वारकरी तसंच भाविकांच्या होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर, प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

------------------------------------------

विशेष कार्यशाळा

शेतीमध्ये आधुनिक विज्ञानाचा वापर करून उत्पादन आणि शाश्वतता वाढवण्याच्या दिशेनं उचललेलं पाऊल म्हणून, 'ॲग्रोव्हिजन'तर्फे, ऊस शेतीसाठी ए.आय. तंत्रज्ञान या विषयावर, उद्या विशेष कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे.दुपारी एक वाजता, राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भूमी उपयोग संस्थान, सभागृह, अमरावती रोड, नागपूर इथं ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.यात शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग आणि फायदे यांची सखोल माहिती मिळणार आहे.ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यावेळी, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

------------------------------------------

डी.गुकेश

क्रोएशिया इथं सुरू असलेल्या, सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत, भारताच्या डी.गुकेशनं विजेतेपद पटकावलं आहे. या स्पर्धेत, गुकेशनं अंतिम फेरीत, अमेरिकेच्या वेस्ली सोचा पराभव केला. १८ पैकी १४ गुण मिळवून, गुकेशनं रॅपिड फॉरमॅटमध्ये, पहिलं स्थान पटकावलं.पोलंडचा, जान क्रिजस्टोफ दुडा, दुसऱ्या स्थानावर असून माजी विश्वविजेता, नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन तिसऱ्या स्थानावर आहे. भारताचा प्रज्ञानंद देखील, या स्पर्धेत सहभागी असून, तो फॅबियानो कारुआना समवेत, संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे.

---------------------------------------------

हवामान

बुलढाणा, अकोला, वाशिम जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी वादळ, विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस आणि विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान प्रादेशिक हवामान विभागानं खबरदारी घेण्याचा इशारा दिला आहे.

---------------------------------------------

स्वच्छता मोहिम

नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर, स्वस्थ आणि हरित स्वरूप देण्याच्या दिशेनं पाऊल टाकत, नागपूर मनपा आणि स्मार्ट सिटी नागपूरद्वारा, 'स्वच्छता अपनाओ, बीमारी भगाओ' अभियानांतर्गत, आज शहरातील दहाही झोन निहाय, सखोल स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.मोहिमेत नागरिकांनी स्वयंस्फूर्ततेनं सहभाग घेत, मनपाच्या उपक्रमाला उत्तम साथ दिली. मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ.गजेंद्र महल्ले यांच्या देखरेखित, मनपाच्या दहाही झोन अंतर्गत, सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

---------------------------------------------